जा.क्र./उविमगु/रोपवाटिका/ ६७८/२०२२.
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग.
दिनांक : 13 APR 2022

प्रति,

......................................
......................................
......................................

**विषय : सालविरहीत आंबा बाटा खरेदीचे दरपत्रक पुरविणेबाबत...**

महाशय,

वरील विषयाबाबत असे कळविण्यात येते की, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे करीता खालीलप्रमाणे सालविरहीत आंबा बाटा खरेदीचे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | अंदाजे खरेदी टन | शेरा |
|---|---|---|---|
| १. | सालविरहीत आंबा बाटा | ४ टन | प्रति टनाचा दर नमुद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे सालविरहीत आंबा बाटा खरेदीचे दर नमुद करून दरपत्रक या कार्यालयात दिनांक २८/०४/२०२२ पर्यंत प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रकाचा लखोटा मोहोरबंद करुन त्यावर " **सालविरहीत आंबा बाटा खरेदीचे दरपत्रक** " असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख करावा.
३) दरपत्रकातील दर उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ कार्यालयास पोहोच असावेत.
४) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६५२० या पत्यावर पाठवावे.
५) दरपत्रकांत या दरपत्रकाच्या संदर्भात उल्लेख असावा.
६) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.
७) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
८) दरपत्रकावर पॅन नंबर व बॅक नंबर तसेच जी. एस. टी. धारक असल्यास जी. एस. टी. नंबर नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत – प्रभारी अधिकारी कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली यांना विनंती करण्यात येते कि, उपरोक्त दरपत्रक मागणीपत्र विद्यापीठ संकेतस्थळावर मुदतीत प्रसिध्द करण्यात यावे.